खबर दि.०८/०६/२०२४

मी आयशा समीर शेख वय २० वर्षे व्यवसाय भिकमागणे रा. व्हर्नल मेमोरीयल मेथेडिस्ट चर्च, मुरबाड रोड कल्याण प. येथील केडीएमसी बसस्टॉप शेजरील फुटपाथवर मुळ रहाणार सिन्नर फाटा रेल्वे स्टेशनचे बाहेर झोपडपटटी नाशिक समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन खबन लिहुन देते की,

मी वरिलप्रमाणे असुन माझे मुळनाव पिंकी प्रेमदास राठोड असे आहे. वरिल ठिकाणी मी माझा नवरा समीर रफीक शेख, मुलगी तुलसुम, मुलगा अरबाज रमीर शेख वय ६ महिने – जन्म डिसेंबर २०२३, बहीण प्रिया भारत गांगुर्डे, भाउजी भारत वसंत गांगुर्डे असे आम्ही रहातो. आम्ही सर्वे कल्याण पसिररात भिक मागुन आमचा उदरनिर्वाह चालवतो. माझी मुलगी तुलसुम ही भिवंडी आमिना बाग नदीनाका येथे माझी सासु जास्मीन शेख हीचेजवळ रहाते. माझे नवरा हा नेहमी नशा करत असल्याने तो आमचे सोबत वरिल ठिकाणी न रहातो. के.के वाईन शॉप कल्याण ट्रॉफीक ऑफीस कल्याण प. च्या समोरील फुटपाथवर झोपतो.

काल दि.०७/०६/२०२४ रोजी रात्रौ ११:०० वाचे सुमारास मी, माझा मुलगा, बहीण व भाउजी असे जेवण करून व्हर्नल मेमोरीयल मेथेडिस्ट चर्च, मुरबाड रोड कल्याण प. येथील केडीएमसी बसस्टॉप शेजरील फुटपाथवर झोली गेलो. झोपतेवेळी माझा मुलगा अरबाज यास माझे शेजारी मच्छरदानीमध्ये झोपवले होते. त्यानंतर आज दि.०८/०६/२०२४ रोजी रात्री ०१:०० वाचे माझा मुलगा अचानक रडायला लागला होता. त्यावेळी मी त्याला मंच्छरदानीतुन बाहेर काढुन त्यास पुन्हा दुध पाजुन पुन्हा मच्छरदानीमध्ये झोपी लावुन मीही त्याचे शेजारी झोपले होते. रात्री ०४:०० वा चे सुमारास अचानक पाउन सुरू झाल्याने मला जाग आली त्यावेळी माझा मुलगा अरबाज हा शेजारी झोपलेला मिळुन आला नाही. व मच्छरदानीही नव्हती म्हणुन मी माझी बहीण, भाउजी यांना झोपेतुन उठवुन त्यांना माझे मुलाबाबत विचारणा करता त्यांनी माहीत नसल्याचे सांगितले. म्हणुन मी रात्रभर आजुबाजेचे पसिररात मुलाचा शोध घेतला असता. तो मिळुन आला नाही. माझे मुलाचे कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी माझे कायदेशीर रखवालीतुन माझे संमतीशिवाल अपहरण केले म्हणुन मी त्याबाबत तक्रार करणेसाठी इकडील पोलीस ठाण्यात आलेले आहे. माझे मुलाचे वर्णन खालीलप्रमाणे.

१) **वर्णनः–** मुलगा अरबाज समीर शेख वय ०६ महिणे, जन्म डिसेंबर २०२३, रंगाने गोरा, चेहरा गोल, अंगावर घामोळया आलेल्या आहेत. डोक्याचे जावळ काढलेले, अंगात पांढऱ्या रंगाचा टी. शर्ट त्यावर इग्रजीमध्ये HAPPY HOLI असे लिहलेले, फिक्कट ऑरेंन्ज कलरची हाफ चडडी,

तरी दि.०८/०६/२०२४ रोजी रात्री ०१:०० ते रात्रौ ०४:०० वा.चे दरम्याण व्हर्नल मेमोरीयल मेथेडिस्ट चर्च, मुरबाड रोड कल्याण प. येथील केडीएमसी बसस्टॉप शेजरील फुटपाथवरून कोणीतरी अज्ञात इसमाने माझा मुलगा अरबाज समीर शेख वय ०६ महिणे, यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी माझे कायदेशीर रखवालीतुन माझे संमतीशिवाल अपहरण केले म्हणुन माझी अज्ञात इसमाविरूध्द तक्रार आहे.

माझी वरिल खबर मी सांगितले प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन मी मला वाचुन दाखवली ती बरोबर आहे.

समक्ष हे लिहुन दिले